13-04-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/12/2025 10:58 PM Page 1

निवडक

रेल्वे स्थानकाजवळील पदपथांची दुरवस्था

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १२ : मडगाव येथील कोकण रेल्वे स्थानकासमोरील पदपथ सध्या अतीव दुर्लक्षित अवस्थेत असून, ते भंगार व कचरा टाकण्यासाठीच्या डंपिंग साइटमध्ये रूपांतरित झाले आहेत. शिवाय, या पदपथांचा वापर रात्रभर बेकायदेशीर वाहन पार्किंगसाठी देखील सर्रास केला जात आहे. एकेकाळी पादचाऱ्यांसाठी सुरक्षित मार्ग असलेले हे फूटपाथ आता सार्वजनिक आरोग्य व सुरक्षिततेच्या दृष्टीने गंभीर धोका निर्माण करत आहेत. यामुळे प्रवाशांत अस्वस्थता पसरली असून, शहराच्या एकंदर स्वच्छता व नागरी व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.स्थानिक रहिवासी आणि दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांनी या परिस्थितीविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. प्रशासनाने या गंभीर समस्येकडे अद्यापही ठोस लक्ष दिलेले नसल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. मडगाव नगर परिषदेने यापूर्वी स्वच्छतेसाठी काही मोहिमा राबवल्या होत्या, मात्र त्या अपुऱ्या व अल्पकालीन ठरल्या असल्याचे चित्र आहे. स्थानिक रहिवासी रोहन नाईक म्हणाले की, या पदपथांची अवस्था गेल्या अनेक महिन्यांपासून अतिशय दयनीय आहे. बाहेरील अनेक लोक रात्रभर येथे आपली वाहने पार्क करतात. काही भंगार विक्रेत्यांनी या जागेचा कचराकुंडीसारखा वापर सुरू केला आहे. त्यामुळे परिसरात सातत्याने गोंधळ व अस्वच्छता पसरली आहे. रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, टॅक्सी चालक देखील दिवसा फूटपाथवर वाहने उभी करतात. त्यामुळे पादचाऱ्यांना वर्दळीच्या रस्त्यावर उतरावे लागते, हे विशेषतः वृद्ध आणि विद्यार्थ्यांसाठी धोकादायक ठरते. शिवाय, साचलेला कचरा व भंगार साहित्य परिसरात दुर्गंधी आणि अस्वच्छतेला कारणीभूत ठरत आहे.यापूर्वी माध्यमांमधून या विषयावर वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर एमएमसी कडून एक स्वच्छता मोहीम राबवण्यात आली होती. मात्र, त्यानंतर सातत्यपूर्ण कारवाई न झाल्यामुळे पुन्हा तीच स्थिती निर्माण झाली आहे, अशी रहिवाशांची तक्रार आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांनी मडगाव नगर परिषदेला विनंती केली आहे की, फूटपाथवरील अतिक्रमण व डंपिंगसारख्या प्रकारांवर तातडीने आणि शाश्वत उपाययोजना कराव्यात. तसेच, या पदपथांना मूळ स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

स्थानिक टॅक्सी चालकांची दादागिरी; रेंट-ए-कॅब चालकांचा संताप

■ टीम दैनिक हेराल्ड

कळंगुट, दि. १२ : मोपा विमानतळावर रेंट-ए-कॅबने प्रवास करणाऱ्या पर्यटकांना स्थानिक टॅक्सी चालकांकडून त्रास दिला जात असल्याचा आरोप उत्तर गोवा रेंट-ए-कॅब असोसिएशनने केला आहे. कळंगुट येथे शनिवारी आयोजित पत्रकार परिषदेत या संघटनेने ही माहिती दिली.

असोसिएशनचे म्हणणे आहे की, बाहेरील राज्यांतून गोव्यात आलेल्या पर्यटकांना त्यांच्या भाड्याच्या वाहनांमधून त्यांच्या नातेवाईकांना विमानतळावरून घेऊन जाण्यापासून टॅक्सी चालकांकडून अडवले जात आहे.

या पार्श्वभूमीवर दिल्लीतील शैला चोप्रा यांनी ८ एप्रिल रोजी एक भाडेचं वाहन घेतलं होते व त्यांच्या खासगी ड्रायव्हरला गोव्यात फिरवण्यासाठी सोबत आणलं होतं. ९ एप्रिल रोजी दुपारी १ वाजता ड्रायव्हर मोपा विमानतळावर चोप्रा यांच्या अल्पवयीन मुली आणि तिच्या मैत्रिणींना घेण्यासाठी गेला असता, तेथील स्थानिक टॅक्सी चालकांनी त्याला थांबवले व मुलींना गाडीतून उतरवले, असा आरोप करण्यात आला.

या संदर्भात चालक रूपेश कुमार यांनी पेडणे पोलीस स्थानकात दिलेल्या तक्रारीत म्हटलं आहे की, निखिल महाले यांच्या नेतृत्वाखालील टॅक्सी चालकांनी आमच्या गाडीला वेढा घातला. त्यांनी १७ वर्षांच्या अल्पवयीन मुलींना गाडीतून उतरवलं आणि आम्ही त्यांची मागणी मान्य केली नाही, तर मला इजा करण्याची धमकी दिली. सामान उतरवल्यानंतर एक टॅक्सी चालक त्या मुलींना त्यांच्या वाहनातून घेऊन जाण्याचा आग्रह धरत होता. यामुळे मुले घाबरली आणि आम्हाला मानसिक धक्का बसला.

कुमार यांनी या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त करताना सांगितले की, या प्रकारामुळे गोव्याच्या पर्यटन संस्कृतीला गालबोट लागत आहे. अशा वागणुकीमुळे पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होते. संबंधित टॅक्सी चालकांवर तात्काळ कठोर कारवाई व्हावी. उत्तर गोवा रेंट-ए-कॅब असोसिएशनचे अध्यक्ष रामदास पालकर यांनी सांगितले, राज्यात कुठेही भाड्याने घेतलेली वाहने ग्राहक वापरू शकतात. एखादा पर्यटक आपल्या भाड्याच्या वाहनातून आपल्या कुटुंबीयांना विमानतळावरून घेऊन जाऊ शकत नाही, असा कोणताही नियम नाही. आम्ही कायद्याचे पालन करत आहोत, आणि अशा प्रकारची छळवणूक आम्ही खपवून घेणार नाही. या प्रकरणामुळे मोपा विमानतळावरील टॅक्सी सेवा आणि रेंट-ए-कॅब दरम्यानचा संघर्ष पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, यावर प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज आहे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

राज्यपालांकडून गोव्यातील लोकांना बैसाखीच्या शुभेच्छा

टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १२ : गोव्याचे राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई यांनी गोव्यातील लोकांना विशेषत: शीख बांधवांना बैसाखीच्या हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत. आपल्या संदेशात राज्यपाल म्हणतात, बैसाखीच्या शुभप्रसंगी मी गोव्यातील लोकांना हार्दिक शुभेच्छा व्यक्त करतो. बैसाखी हा शीख समुदायाचा सर्वात महत्वाचा सण आहे, जो मोठ्या थाटामाटात आणि आनंदाने साजरा केला जातो. १६९९ मध्ये याच दिवशी शिखांचे दहावे गुरु गुरु गोविंद सिंग यांनी पंथ खालसाची स्थापना केल्यामुळे याला एक धार्मिक महत्त्व आहे. बैसाखी हा सण म्हणजे शीख समुदायाच्या नवीन वर्षाचा प्रारंभ. या सणाला प्रदेशानुसार वेगवेगळी नावे आहेत. आपल्या भारतात धार्मिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि सामाजिक महत्त्व असलेले अनेक सण आणि परंपरा आहेत. समाजात सुखाचे आणि आनंद वातावरण निर्माण करण्यासोबतच राष्ट्रीय एकता आणि सामाजिक अखंडता बळकट करण्यासाठी असे सण महत्त्वाची भूमिका बजावितात. इतर प्रत्येक भारतीय सणाप्रमाणे, बैसाखी हा सणही लोकांना एकत्र आणतो. या वर्षाचा बैसाखीचा हा शुभ सोहळा गोव्यातील लोकांना नवीन आनंद आणि समृद्धी घेऊन येवो, असे राज्यपाल म्हणाले.

शॅक मालकांनी मांडल्या अनेक समस्या

पर्यटन हंगामातील समस्यांवर चर्चा : संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांशी भेट

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव,दि. १२ : गोव्यातील शॅक मालकांनी चालू पर्यटन हंगामातील समस्यांवर चर्चा करण्यासाठी आणि आगामी हंगामासाठी सूचना मांडण्यासाठी नुकतीच पर्यटन विभागाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. ही बैठक दोन टप्प्यांत पार पडली. पहिल्या सत्रात पर्यटन संचालक केदार नाईक उपस्थित होते. तर दुसऱ्या सत्रास पर्यटन मंत्री रोहन खंवटे यांनी शॅकमालकांशी चर्चा केली. या संवाद सत्रास कामकाजाचा आढावा घेणारी नियमित सल्लामसलत असे स्वरूप देण्यात आले असून, दोन्ही बाजूंनी या चर्चेला सकारात्मक प्रतिसाद दिला.

गोवा शॅक ओनर्स वेलफेअर सोसायटीच्या सदस्यांनी चर्चेदरम्यान अनेक महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले. विशेषतः समुद्रकिनाऱ्यांवरील आक्रमक भटक्या कुत्र्यांमुळे पर्यटकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाल्याचे त्यांनी निदर्शनास आणले.

फक्त नसबंदी पुरेशी नाही, असे मत एका शॅक मालकाने व्यक्त केले. त्यांनी 'मिशन रेबीज' अंतर्गत सुरू असलेल्या मोहिमेची नोंद घेतली असली तरी, आक्रमक कुत्र्यांची ओळख पटवून त्यांना हटवण्याच्या दिशेने तातडीची कारवाई करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.शॅक परवान्यांच्या मंजुरीसाठी अधिक सुलभ, सिंगल विंडो' प्रक्रिया सुरू करण्याची, करप्रणाली सोपी करण्याची आणि नियमांची स्पष्टता सुनिश्चित करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

पर्यटकांची घटती संख्या हे मालिश करणारे अनधिकृत व्यावसायिक आणि फेरीवाले यांच्यामुळे आहे, या पर्यटन खात्याच्या दाव्याला शॅक मालकांनी विरोध केला. खऱ्या समस्यांकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे, असे एका ऑपरेटरने सांगितले. त्यांनी बेकायदेशीर दलाल व वेश्याव्यवसाय रॅकेट्सकडे लक्ष वेधले, जे गोव्याच्या प्रतिमेला धक्का पोहोचवत असल्याचा आरोप त्यांनी केला.

सार्वजनिक शौचालये व कपडे बदलण्याच्या खोल्यांची दयनीय अवस्था, तसेच काही सुविधा स्थापनेनंतर काही वर्षांतच बंद पडल्याची तक्रारही बैठकीत मांडण्यात आली. बागा येथे, शासकीय सुविधेसाठी खोदलेल्या बोअरवेलमुळे उघड्या सांडपाण्याचा स्त्राव होत असल्याचे शॅक मालकांनी निदर्शनास आणले.यासंदर्भात बोलताना पर्यटन संचालक नाईक यांनी एक किंवा दोन ठिकाणी समस्या असू शकतात, असे मान्य केले, मात्र बहुतेक सुविधा कार्यरत असल्याचा दावा केला. त्यांनी कंत्राटदार बदलण्याची आणि देखरेखीची व्यवस्था अधिक सक्षम करण्याचे आश्वासन दिले.

समुद्रकिनाऱ्यांवरील झोपड्यांसाठी सामायिक सांडपाणी पाइपलाइन नेटवर्क उभारण्याच्या प्रस्तावावरही पुन्हा चर्चा करण्यात आली. या योजनेअंतर्गत प्रत्येक झोपडीचे मीटरद्वारे मोजमाप केले जाईल आणि वापरानुसार शुल्क आकारले जाईल. झोपडी मालकांनी पुढील हंगामापूर्वी या योजनेची अंमलबजावणी करण्याची विनंती केली आहे.पर्यटनस्थळी वाहतुकीची गर्दी कमी करण्यासाठी पादचारी मार्ग अधिक चांगले बनवण्याची आणि वाहन प्रवेशावर मर्यादा आणण्याचीही मागणी करण्यात आली. पर्यटकांना समुद्रकिनाऱ्यांवर मोकळेपणाने फिरता आले पाहिजे, असे एका सदस्याने सांगितले. बेकायदेशीर भाडेमट्ट्यांवर थेट चर्चा झालेली नसली तरी, गोव्यातील स्थानिकांनाच शॅक व्यवसाय चालवण्याची मुभा द्यावी, हा आग्रह शॅक मालकांनी पुन्हा एकदा व्यक्त केला. या मुद्द्यावर बोलताना संचालक नाईक यांनी काही उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कारवाई सुरू असल्याचे स्पष्ट केले आणि पुढील तपासणीचे संकेत दिले.

सोनसोडोतील सांडपाणी संकट; एमएमसीला अल्टिमेटम

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १२ : आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सोनसोडो डंपिंग साइटवरील अपघात आणि सार्वजनिक आरोग्य धोक्यांना आळा घालण्यासाठी तातडीच्या उपाययोजना राबवण्याच्या उद्देशाने मडगाव नगरपरिषद (एमएमसी) अधिकाऱ्यांसोबत शनिवारी दुपारी एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत अभियंते, साइट पर्यवेक्षक आणि स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

ही बैठक मुख्यत्वे ड्रेनेज आणि सांडपाण्याशी संबंधित समस्यांच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आली. काही आठवड्यांपूर्वी, एप्रिलच्या सुरुवातीस, सोनसोडो साइटवरील सांडपाणी मुख्य रस्त्यावर वाहत गेल्याने अपघात घडले होते. या घटनेमुळे एमएमसीच्या यंत्रणेच्या ढिसाळ प्रतिसादावर आणि निष्काळजीपणावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.

कुडतरीचे आमदार रेजिनाल्ड यांनी बैठकीत स्पष्ट शब्दांत एमएमसीला मंगळवारपर्यंत समस्या सोडवण्यासाठीची अंतिम मुदत दिली. सद्यस्थितीत असलेल्या ड्रेनेज यंत्रणेची तात्काळ दुरुस्ती केली जावी आणि जोरदार पावसात रस्त्यावर सांडपाण्याचा ओव्हरफ्लो होऊ नये यासाठी अतिरिक्त ड्रेनेज व्यवस्था उभारण्यात यावी, असा ठराव या बैठकीत सर्वानुमते पारित करण्यात आला.

नगरपालिकेला सोमवारी किंवा उशिरात उशिरा मंगळवारी पर्यंत काम पूर्ण करण्याची स्पष्ट सूचना दिली आहे. जर त्या वेळेत काही हालचाल झाली नाही, तर आम्ही स्वतःच्या मनुष्यबळाचा वापर करून ही कामे पूर्ण करू, असा इशारा आमदार रेजिनाल्ड यांनी दिला. सार्वजनिक आरोग्य आणि नागरिकांची सुरक्षितता हे आमच्यासाठी सर्वोच्च प्राधान्याचे मुद्दे आहेत असे तयांनी सांगितले .

त्यांनी यावेळी राजकारणापलीकडे जाऊन जनतेच्या हितासाठी तात्काळ व ठोस कारवाई करण्याची आपली बांधिलकी अधोरेखित केली. आम्हाला आमच्या मतदारसंघातील जनतेला त्रास होऊ द्यायचा नाही. आमचे कार्य ही केवळ राजकीय जबाबदारी नसून जनतेविषयी असलेली आमची बांधिलकी आहे. सर्वशक्तिमान देवाच्या आशीर्वादाने आम्ही जनहितार्थ कार्य करत राहू, असेही त्यांनी नमूद केले.

बैठकीच्या शेवटी, सार्वजनिक सुरक्षेच्या बाबतीत कोणतीही तडजोड होणार नसल्याचे स्पष्ट करत, संबंधित अधिकाऱ्यांकडून जबाबदारीने आणि नियमितपणे कारवाई होईल याची खात्री केली जाईल, असे आश्वासन उपस्थित प्रतिनिधींनी दिले.

Kia Syros
Evolved by the future

At Kia, safety isn't just a feature, it's our promise. The new Syros raises the bar with a bold design, cutting-edge technology, first-of-its-kind features and advanced safety. And now with a 5-star BNCAP rating, it goes on to prove that the new Syros is not just built to impress, but is a complete package.

Enhanced Protection Safety, reimagined

ADAS~ Level 2.0	6 Airbags Standard	Robust 20 Standard Safety Features	Smart Dashcam with Dual Camera	360 Degree Camera with Blind View Monitor

Innovative Technology Future, reimagined

Dual Pane Panoramic Sunroof

2nd Row Seat Reclining & Sliding with Seat Ventilation (Seats Only)

76.20 cm (30") Trinity Panoramic Display Panel

Kia Connect 2.0** with Over-the-Air (OTA) Software Updates and Other 80+ Connected Car Features

Harman Kardon Premium 8 Speakers Sound System

Electric Parking Brake with Auto Hold

Book now | **Call** 1800 108 5000 | 093195 91407 | **Visit** www.kia.com | Kia Syros

Terms & Conditions Apply. *Ex-showroom price all India. Segment is defined as vehicle with length between 3 990 mm – 3 999 mm and height - 1 680 mm. **Kia Connect 2.0 comes with 3 years free subscription. Kia Connect 2.0 features may vary depending on the variant, device compatibility, software and network availability in the vehicle. ~Advanced Driver Assistance System (ADAS) is not a substitute for human eye and driver vigilance. It is an assistance feature that enhances driving experience and safety. Effectiveness of ADAS may vary based on actual situation and all objects around vehicle may not be detected. The driver shall remain responsible for safe, vigilant, and attentive driving. The product & feature images shown in this advertisement are for representation purposes only. Color, features and specifications as shown may not be part of standard fitment and may vary or differ slightly depending on models/variants from the one shown in this advertisement. Model shown is subject to availability and may not be available across all variants. Kia India Pvt. Ltd. (Formerly known as Kia Motors India Private Limited) reserves the right to make any changes with respect to the trims, colors, specifications, other details of any model as mentioned or to discontinue any model without prior notice. For more details visit your local Kia dealership. Kia India Pvt. Ltd. urges you to follow traffic rules, these are meant to keep you safe on roads. We do not endorse vandalism or illegal activities related to road safety. Safety is a top priority, and we urge responsible behavior regarding traffic regulations and road safety.

FOR INFORMATION CONTACT: **GOA: AUTOMOTIVEIS DE CRISTAL KIA**, VERNA, PH: 7719816666, MAPUSA NORTH GOA, PH: 9172415444

INNOCEAN•018/25